भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र. ४८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०१/२०१७

**१) जेलमधील आरोपीने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १९/०१/२०१७ चे १५.०० ते १५.१५ वा. दर. यातील फिर्यादी हा वार्ड क्र.६,७,९ मध्ये डयुटी वर असतांना यातील बंदीस्त आरोपी याने बॅरेक क्र.१ १ मधुन धावत सुअुन माझ्या पत्नीला व मुलीला माझे भावु तुकडे करून टाकतील म्हणुन मि जिव देत आहे असे बोलुन आरोपी हा जेलमधील आब्यांचे झाडावर चढुन खाली उडी मारून आत्महत्या करण्याच्या प्रयत्न केल्याने सरतर्फे फिर्यादी रामाजी सोनवाने जिल्हा कारागृह वर्ग १ भंडारा (जेल रक्षक) यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) इंन्कमटॅक्स ऑफीसर आहे असे सांगुन तोतयागीरी केल्याने गुन्हा नोंदः–**

दिनांक २०/०१/२०१७ चे १०.३० वा. दर. यातील आरोपी हा फिर्यादी दिपक सुंदरलाल थानथराटे वय ३५ वर्ष रा. साकोली यांचे लॉयसन्स प्रापत देशी दारूचे दुकानात जाउन मि इकमटॅक्स ऑफीसर आहे असे सांगुन दारूचे दुकानाचे रिकार्ड दाखवा ते मला तपासायचे आहे असे बोलुन फिर्यादीने आरोपीस त्याचे ओळखपत्र मागितले असता त्याने ओळखपत्र दाखवीले नाही व उलट तुम्ही धंदा कसा करता तुम्हाला पाहुन टाकीन अशी धमकी दिल्याने आरोपीची वैदयकीय तपासनी अधीकारी साकोली यांचे कडुन केली असता दारूचे नशेत असल्याचा अभिप्राय दिल्याने व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७०,५११,५०६ भादवी. सहकलम ८५(१) म.दा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलगी शाळेत जाते म्हणुन घरून निघुन गेल्याने गुन्हा नोंदः–**

दिनांक १९/०१/२०१७ चे ०९.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरून बेटाळा येथे शाळेत जाते म्हणुन घरून निघुन गेली व ति आतापर्यत घरी परत न आल्याने तिला कोणीतरी अज्ञात इसमाने पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन व शासनाचे परीपत्रकान्वये पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी . :–**

दिनांक २०/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, जवाहनगर, मोहाडी, कारधा, करडी, वरठी, तुमसर, सिहोरा, गोबरवाही, लाखणी, अडयाळ व लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण २८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १७१ लिटर हातभट्टी दारु + २०० किलो सडवा + काळया कि. २२,४१०/–रु. व १६ लिटर ४७० मिलीलीटर देशी दारू .कि. ४,५५०/–रू तसेच जुगारातुन कि.२१४० /–रू असा एकुन २९,१००/–रू चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.